प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

## सिडको प्रशासनिक क्षेत्रातील ग्राहकांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत प्रलंबित पाणीपट्टी देयके भरण्याचे सिडकोचे आवाहन

### विहित मुदतीत थकबाकी न भरल्यास होणार दंडात्मक कारवाई

सिडको प्रशासनिक क्षेत्रातील ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत त्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकीत देयकांचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले असून, विहित मुदतीमध्ये प्रलंबित देयकांचा भरणा करण्यास असमर्थ ठरणाऱ्या ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन पाणी पुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

सिडको प्रशासनिक क्षेत्रातील गावांना आणि नोडना सिडकोतर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणी पुरवठा नियमित आणि अखंडित करण्यासाठी तसेच देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यासाठी ग्राहकांनी पाणीपट्टी देयकांचा भरणा वेळेवर करणे आवश्यक आहे. याकरिता ज्या ग्राहकांची पाणीपट्टी देयके प्रलंबित आहेत त्यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत थकबाकीचा भरणा करण्याचे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आला आहे. विहित मुदतीत थकलेली पाणी देयके न भरल्यास संबंधित ग्राहकांवर, सिडकोच्या नियमानुसार दंडात्मक कारवाई करून त्यांचा पाणी पुरवठाही खंडित होऊ शकतो, असा इशार देखील सिडकोतर्फे देण्यात आला आहे.

ग्राहकांना पाणी देयके ऑनलाइन पद्धतीने, अधिकृत संकलन केंद्रांवर किंवा सिडको कार्यालामध्ये भरण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. तसेच पाणीपट्टी देयकामध्ये काही त्रुटी अथवा शंका असल्यास संबंधित सिडको कार्यालयासोबत त्वरित संपर्क साधण्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे. जेणेकरून यासंभर्षात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. संबंधित ग्राहकांनी पाणीपट्टी देयकांचा भरणा वेळेवर करून पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सिडकोला सहकार्य करण्याचे आवाहन सिडकोने केले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -